# २१ व्या शतकातील क्रीडा धोरण

*प्रा.डॉ. सचिन तानाजीराव पाटील

**प्रा.डॉ. हेमंतकुमार आ. नारायणकर

**सारांश :-**

सुदृढ शरीरात सुदृढ मन या उक्तीप्रमाणे तंदुरूस्ती व खेळाचे मानवी जीवनात अपार महत्व आहे. आजच्या यांत्रिकी, धकाधकीच्या व स्पर्धात्मक युगामध्ये नागरिकांमध्ये जीवनशैली शारीरिकदृष्ट्या निष्क्रीय होत असून शारीरिक हालचाली, व्यायामाचा अभाव व वाढते प्रदुषण यामुळे अनेक दुर्धर विकार नागरिकांना त्रस्त करीत असल्याचे दिसून येत आहे. याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होत आहे. शारीरिक सुदृढता व याद्वारे आरोग्य संपन्न जीवन नागरिकांना जगता यावे यासाठी प्रयत्न करणे.

क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन, गांव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा क्रीडापीठ व क्रीडा प्रबोधिनी संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी, राज्य क्रीडा विकास निधी, क्रीडा विकासासाठी आवश्यक क्रीडा सुविधा विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर क्रीडा संकुल उभारून उपलब्ध करून देणे, त्याप्रमाणे गांव पातळीवर खेळाच्या किमान सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण राबविण्यात येत आहे. उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडू घडविणे, बालवयातच खेळाची आवड निर्माण करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्टे आहे.

खेळाडूकरीता ग्रामीण व नागरी भागात राज्य राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात विभागीय, जिल्हा तालुका क्रीडा संकुलांची स्थापना करण्यात येत असून तालुका क्रीडा संकुलासाठी रू.१.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुल रू.८ कोटी आणि विभागीय क्रीडा संकुलासाठी रू.२४.०० कोटी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय.

केंद्रशासनाच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यामध्ये पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियान हा महत्वात्कांक्षी प्रकल्प राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या अभियानाद्वारे ग्रामीण भागात क्रीडा विषयक उपक्रम राबवुन तसेच खेळाच्या किमान सुविधा विकसित करून क्रीडा जागृती करयाचे धोरण.

**प्रस्तावना :-**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाच्या पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने पुढाकार घेतलेला आहे. क्रीडा धोरणामध्ये अनुक्रमे खेळाडू व खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता या बाबीं केंद्रभूत करण्यात आलेल्या आहेत.

*मो.प.पाटील महाविद्यालय बोरगांव

**वाय.सी.कॉलेज, इस्लामपूर.



Special Issue on : Transformation in Language, Literature, Society & Culture in the 21st Century 29 Dec, 2017 ISSN : 2319-3689

राज्यात क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राहण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडूंच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हिजाच्या शिफारशी, उपाययोजना प्रस्तावित क्रीडा धोरणात सुचविलेल्या आहेत.

व्यायाम व खेळाची आवड, आरोग्य संपन्न जीवन, नागरिकांची तंदुरूस्ती वाढविण्यासाठी या सुविधांचा विकास राज्यात सर्वत्र होणे आवश्यक आहे. खेळाडूंना तज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रगत प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा व राज्य स्तरावर अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण देण्याची सुचना केली आहे. यामध्ये, राज्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना देशी, विदेशी तज्ञांचे मार्गदर्शन देणे, अद्ययावत क्रीडा साहित्याची उपलब्धता, खेळाडूंचा प्रवास, आहार इ. वरील खर्च भागविण्यासाठी तरतूद उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच विविध खेळांच्या एकविध संघटनानांही भरीव अर्थसाहाय्य करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत.

खेळाच्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक असल्याने राज्यातील क्रीडा प्रशिक्षकांसाठी अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख, चर्चासत्र, परिसंवादाचे आयोजन करणे, इ.बाबींचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण भागात, पंचायत युवा व खेळ अभियान या योजनेअंतर्गत प्रतिवर्षी २८०० ग्रामपंचायती व ३५ पंचायत समित्यांमध्ये पुढील १० वर्षात क्रीडा विषयक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करून क्रीडा विषयक अभ्यासक्रमात सुसुत्रता, संशोधन इ. करणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा विकास क्रीडा विकास निधी सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**राज्याचे क्रीडा धोरण :–**

क्रीडा धोरण, २०११ तयार करण्याकरिता भारतीय खेळ व इनडोअर खेळ, शालेय शिक्षण व खेळ, आऊटडोअर स्पोटर्स, ॲडव्हेंचर व वॉटर स्पोर्टस, क्रीडा संस्कृती वाढविणे व क्रीडा सुविधा उपलब्ध करणे यासाठी उपसमित्या गठीत करून राज्यातील क्रीडाप्रेमी नागरीक, खेळाडू, क्रीडा संस्था तसेच विधान मंडळाच्या सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन समितीने शिफारशी केलेल्या आहेत.

केंद्र सरकारने सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक शिक्षणाच्या मूलभुत अधिकाराचा समावेश केला आहे. यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम केला आहे. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची मुल्ये शिक्षणातून साधली जावू शकतात त्यामुळे शिक्षण देशाच्या व राज्याच्या विकासाचा घटक आहे.

जीवनात शिक्षण हे निश्चितच महत्वपूर्ण अंग असले तरी केवळ पुस्तकी शिक्षण एवढेच अभिप्रेत नुसन शालेय शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण व क्रीडा हा शारीरिक व मानसिक सक्षमतेसाठी शिक्षणाचा



Special Issue on : Transformation in Language, Literature, Society & Culture in the 21st Century 29 Dec, 2017 ISSN : 2319-3689

अविभाज्य भाग आहे.

लहान वयात मुलांच्या सुप्तगुणांना वाव देवून, शोध घेणे, उदयोन्मुख खेळाडूंना प्रशिक्षीत करणे अत्यावश्यक आहे. शारीरिक शिक्षण व क्रीडा यांचे महत्व ओळखून त्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. सर्व स्तरावरचे शिक्षण घेत असताना खेळ व क्रीडेचा पाया भक्कम करणे आवश्यक असून खेळाडू म्हणून कारकीर्द करण्यात पूरक वातारवण करणे आवश्यक आहे.

**१. शारीरिक शिक्षण शिक्षक नियुक्तीबाबत प्रभावी अंमलबजावणी :-**

अ) माध्यमिक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची नियुक्ती.

ब) उच्च माध्यमिक शाळांमध्ये किमान एक अथवा विदयार्थ्यांच्या संख्येवर आधारित शारीरिक शिक्षण शिक्षकाची नियुक्ती.

क) प्राथमिक शाळांमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षकाची नियुक्ती.

ड) महाविद्यालयांमध्ये क्रीडा संचालक पदाची समांतर रचना करणे.

**२. खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रम सामाबेश करणे.**

अ) वेळापत्रकात क्रीडा विषयांचा किमान तासिका.

ब) शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे पुर्नमल्यांकन.

३. क्रीडा संहिता तयार करणे.

४. शाळांचा क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग.

५. शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यामापन कार्यपध्दती.

१० वी १२ वी च्या परीक्षांमध्ये शारीरिक शिक्षणाचे महत्व जागवण्यासाठी परीक्षा मंडळाद्वारा घेतल्या जाणाऱ्या (उदा – विज्ञान) लेखी व प्रात्यक्षिक स्वरूपाच्या परीक्षा प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतात याच धर्तीवर शारीरिक शिक्षण या विषयाच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

६. क्रीडा प्रबोधनी

राज्य शासनामार्फत विविध जिल्हयांत ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. यामध्ये एकूण ७५० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. प्रचलित पध्दतीत निवड प्रक्रियेद्वारे या प्रबोधिनीत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. परंतु सदर प्रबोधिनीत संपूर्ण क्षमतेमध्ये विद्यार्थी सहभागी झाल्याने दिसत नाही. या योजनेची व्यापक प्रसिध्दी तसेच प्रचलित निवड पध्दत शिथिल करणे अत्यावश्यक आहे. यासाठी खालील उपाययोजना आवश्यक आहेत. क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश देताना ज्या बॅटरी ऑफ टेस्ट घेतल्या जातात त्या चाचण्यांचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने तिच्या सुचना तात्काळ सादर कराव्यात तसेच प्रबोधिनीच्या प्राचार्य पदासाठी क्रीडा क्षेत्रातील व्यक्तीची नेमणूक करावी.

७. अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना

खेळाडूंना स्थानिक स्तरावर खेळाच्या उत्तम सुविधा व तांत्रिक प्रशिक्षण नियमित दिल्यास खेळाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. पालक आपल्या पाल्यांना घरापासून लांब ठेवण्यास तयार नसतात, यासाठी स्थानिक स्तरावर अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात यावी.

८. राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खेळाडूंसाठी विशेष गुण सवलत –

९. शालेय क्रीडा स्पर्धा

अ) महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय, व राज्यस्तरीय अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. क्रीडा खात्यातील मनुष्यबख, खेळांची संख्या व आर्थिक तरतूद पाहता स्पर्धांचे आयोजन योग्य प्रकारे करण्यात अनेक अडचणी येत आहेत. यासाठी खेळांची संख्या मर्यादीत करणे आवश्यक आहे.

ब) शासकीय/निमशासकीय सेवेतील खेळाडूंना सवलती.

क) खेळाडूंच्या पालकांना रजा सवलती

१०. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्ध्येमध्ये प्राविण्य मिळविण्याऱ्या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान.

११. शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता.

१२. क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन–क्रीडा सप्ताह साजरा करणे.

अ) क्रीडा महोत्सव.

ब) क्रीडा दिन–क्रीडा सप्ताह साजरा करणे.

१३. स्पोर्टस नर्सरीची स्थापना

१४. क्रीडा वाङःमय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना

अ) क्रीडा वाङःमय निर्मिती

ब) क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना

१५. क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी

१६. क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर

१७. क्रीडांगणांचे आरक्षण

१८. क्रीडा अभियान

१९. क्रीडा साहित्य अनुदान

२०. खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य.

२१. शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्व जागविणे.

२२. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे.

२३. आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण(पायका) व माहिला क्रीडा स्पर्धेत सहभागी

खेळाडूंना शिष्यवृत्ती

२४. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना

२५. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे.

**शासनाने विविध पुरस्कार :-**

राज्य क्रीडा पुरस्कार

१) शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार

२) उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार

३) जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार

४) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार(संघटक/कार्यकर्ते)

५) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार(खेळाडू)

६) एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार(अपंग खेळाडू)

७) जिल्हा क्रीडा पुरस्कार

**खेळाडूंना नोकरीसाठी सवलती :-**

नोकऱ्यासाठी सवलत अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना खेळाडू आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची क्रीडा शासकीय, निमशासकीय व इतर प्रमाणपत्रे व त्यांनी नोकरी मिळण्यासाठी केलेला अर्ज क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण.

शासनाची क्रीडा गुणाबाबत सवलत :-

३) क्रीडा गुण सवलत

अ) १० वी व १२ वी शालांत परिक्षेतील खेळाडूंना वाढीव २५ क्रीडा गुण सवलत राज्यस्तरीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना वाढीव २५ क्रीडा गुण देण्यात येतात याची अंमलबजावणी सन २००६-०७ या वर्षापासून करण्यात येत आहे.

ब) इ ११ वी प्रवेशासाठी खेळाडूंना ३ टक्के आरक्षण राज्य राष्ट्रीय स्पर्ध्येत सहभागी खेळाडूंना ११ वी प्रवेशामध्ये विशेष सवलत देवून उपजत क्रीडा गुण असलेल्या मुला-मुलींना खेळाकडे आकर्षिले जावे यासाठी खेळाडूंना ३ टक्के जागा राखीव ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे.

४) महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण

**क्रीडा धोरणाच्या महत्वपूर्ण शिफारशी :-**

१. शारीरिक शिक्षण शिक्षक नियुक्ती बाबत प्रभावी अंमलबजावणी

२. खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे

३. क्रीडा संहिता तयार करणे.

४. शाळांचा क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग

५. शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपध्दती

६. क्रीडा प्रबोधिनी

७. अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना

८. राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खेळाडूंसाठी विशेष गुण सवलत

९. शालेय क्रीडा स्पर्धा

१०. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्ध्येमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या शाळांना प्रोत्साहानात्मक अनुदान

११. शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता,

१२. क्रीडा महोत्सवाचे आयोजन

(क्रीडा दिन प्रति तालुका रू.१०,०००/- व क्रीडा सप्ताह रू.२५,०००/-)

१३. स्पोर्टस नर्सरीची स्थापना

१४. क्रीडा वाङःमय निर्मिती, क्रीडा वस्तु संग्रहालय न क्रीडा ग्रंथालयाची स्थापना

१५. क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पुररकार व उच्च पदावरील सेवेतील संधी

१६. क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन

१७. क्रीडांगणाचे आरक्षण

१८. क्रीडा अभियान

१९. क्रीडा साहित्य अनुदान

२०. खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक साहाय्य.

२१. शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्व जागविणे

२२. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे.

२३. आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण(पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती

२४. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना

२५. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडख स्थापन करणे

२६. आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना

**भारतीय खेळ व इनडोअर खेळ**

१. तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे

२. वयोवृध्द खेळाडू व कुस्तीगिरांना मानधनात वाढ

३. छ.शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै.भाई नेरूरकर चषक खोखो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे, मॅराथॉन स्पर्धा



Special Issue on : Transformation in Language, Literature, Society & Culture in the 21st Century 29 Dec, 2017 ISSN : 2319-3689

आयोजन(राज्य रू.५०.०० लक्ष, जिल्हा रू.२.०० लक्ष तालुका रू.०.७५ लक्ष प्रमाणे)

४. कुस्तीगिरांच्या मानधनात वाढ

५. राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन

**आऊटडोअर स्पोर्टस, ॲडव्हेंचर व वॉटरस्पोर्टस**

१. महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस सेंटरची स्थापना करणे

२. साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे

३. साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन

४. साहसी क्रीडा पुरस्कार

५. साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्थां व खेळाडूंना आर्थिक साहाय्य देणे

६. साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा साहीत्यासाठी अनुदान देणे.

**क्रीडा संस्कृती**

१. विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरूस्ती

२. आमदार स्थानिक विकास निधितून क्रीडा विषयक उपक्रमासाठी सहाय्य

३. राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना

४. खेळाडूंसाठी गौरव व प्रोत्साहन व बक्षिसे

५. एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन

६. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे

७. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे

८. आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क, इ.करिता आर्थिक मदत करणे.

९. खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता

१०. क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

११. क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ.करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे

१२. क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल

१३. नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर

१४. खेळाडूंना शासकीय निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती

१५. क्रीडा विषयक योजनांमध्ये सुधारणा

१६. महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडा विषयक बाबीवर ५ टक्के खर्च करणे

१७. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे

१८. तालुका, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रे सक्षम करण्यासाठी उपाययोजना

१९. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सक्षमीकरण

२०. क्रीडा सुविधा निर्मितीसाठी बांधकाम, क्रीडा साहित्य आर्थिक साहाय्य करणे

२१. क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना

**समारोप**

आजच्या यांत्रिकी, धकाधकीच्या व स्पर्धात्मक युगामध्ये नागरिकांमध्ये जीवनशैली शारीरिकदृष्टया निष्क्रीय होत असून शारीरिक हालचाली, व्यायामाचा अभाव व वाढते प्रदुषण यामुळे अनेक दुर्धर विकार नागरिकांना त्रस्त करीत असल्याचे दिसून येत आहे. राज्यात क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राहण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने अतिउच्च गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. अतिउच्च कामगिरी करणाऱ्या खेळाडूंस थेट वर्ग १ व वर्ग २ मध्ये नियुक्त्या मिळतात. त्याचबरोबर स्वयंसिध्दा प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्यशासनाने खेळाडूंच्या शिष्यवृत्तीत तसेच वयोवृध्द खेळाडूंना व महाराष्ट्र केसरी यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय झाला. या सर्व गोष्टीचा विचार करता महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण हे चांगल्या पध्दतीने जर राबविले गेले तर निश्चितच अतिउच्च कामगिरी करणाऱ्या खेळाडूला चांगल्या नोकरीत नियुक्ती मिळले व अनेक नवीन खेळाडू तयार होवू शकतील.

**संदर्भ :-**

१) www. mea.gov.in.

२) www.google.com

३) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य.

४) महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण(मसूदा)